सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ७२/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. गणपत भिमराव वाळवे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
वरळी विभाग, डॉ.ए.बी.रोड, वरळी,
मुंबई -४०० ०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-३)**
बावला कंपाऊंड, भायखळा,
मुंबई -४०० ०२७.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०५.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १४.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४७०० प्रकरणी आयोगाने दि.०९.०१.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकाऱ्यांनी चौकशीच्या या टप्प्यावर उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थींना दि. ३१.०१.२०१९ पर्यंत द्याव्यात."

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. ७२/२०१९ मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ३०.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे नमुद केले की, आयोगाचे आदेश दि. ०९.०१.२०१९ च्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि. ०४.०३.२०१९ रोजी माहिती देण्यात आली आहे व त्याबाबतचा अहवाल आयोगास दि. २४.१०.२०२० रोजी सादर करण्यात आला आहे.

जन माहिती अधिकारी यांचा दि. २४.१०.२०२० रोजीचा अहवाल आयोगाच्या अभिलेखावर उपलब्ध आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाचे आदेश दि. ०९.०१.२०१९ नुसार उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
31-5-2024.

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ३१.०५.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai